Smt. P.D. Hinduja Trust's
K.P.B. HINDUJA COLLEGE OF COMMERCE
Sindhi Linguistic Minority Institution: (Autonomous)
(Affiliated to University of Mumbai) : NAAC Re-Accredited With "A+" Grade: CGPA: 3.59
Current Address (Temporary): Sadhana House, 570, Pandurang Budhkar Marg,
Behind Mahindra Towers, Worli, Mumbai – 400018. Contact Details Tel: 022-4098-9000.
Email: info@hindujacollege.Com : Website: www.hindujacollege.edu.in
Prin. Dr. Navin M. Punjabi Ref. No. :

Report on "Vachan Prerna Din" by Marathi Vangmay Mandal, 15th October, 2026.

के. पी. बी. हिंदुजा कनिष्ठ महाविद्यालय, वरळी येथील मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त तसेच प्रसिद्ध मराठी कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात काव्यवाचन स्पर्धा आणि भित्तिचित्र रेखाटन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनातून मराठी विभागाच्या श्रीमती ज्योती भारती यांनी नारायण सुर्वे यांच्या जीवनप्रवासाचा आणि साहित्यिक योगदानाचा परिचय करून दिला. त्यांच्या कवितांमधून व्यक्त होणारी श्रमिकांची वेदना, संघर्ष, वास्तवाचे भान आणि सामाजिक जाणीव यांवर त्यांनी प्रकाश टाकला. हिंदी विभागाच्या श्रीमती अर्चना अंचलवार यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. इंग्रजी विभागाच्या श्रीमती आरती साखरे यांनी आपल्या मनोगतात वाचनाचे अनन्यसाधारण महत्त्व विशद केले. वाचनामुळे ज्ञानाचा विस्तार होतो, विचारप्रक्रिया समृद्ध होते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले.

काव्यवाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. या स्पर्धेत अकरावीच्या धीरज कांबळे आणि श्रावणी मोरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. भित्तिचित्र रेखाटन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सुंदर दर्शन घडवले. या स्पर्धेत अकरावीच्या कनिष्का कोरेकर हिने प्रथम स्थान मिळवले.

दोन्ही स्पर्धांचे परीक्षण गणित विभागाच्या श्रीमती भारती कासार आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या प्रमुख श्रीमती श्रद्धा मुणगेकर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील कल्पकता, अभिव्यक्ती, सर्जनशीलता आणि कलात्मकतेचे मूल्यमापन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचन, कविता आणि चित्रकलेच्या माध्यमातून आपल्या भावना व विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली. साहित्य आणि कलेविषयी आवड निर्माण होण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळाले. वाचनसंस्कृतीचा प्रसार, साहित्यिकांविषयी आदर आणि कलात्मक अभिव्यक्तीचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.